**मुंबई विद्यापीठ**
**राष्ट्रीय सेवा योजना विभाग**

**विद्यापीठ विद्यार्थी भवन,**
**दुसरा मजला, बी रोड,**
**चर्चगेट,**
**मुंबई ४०० ०२०**
**जा.क्र NSS/ECD/2020-21/26**
दि. २१/०८/२०२०

प्रति:
प्राचार्य,
रा.से.यो. एकके असलेली मुंबई विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये,

महोदय,

**विषय : राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांसाठी घोष वाक्य, पोस्टर व निबंध स्पर्धेचे आयोजन**

मागील पाच महिन्यांपासून कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक कार्यरत आहेत. याच कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यंदाचा गणेशोत्सव साजरा होत आहे.

महाराष्ट्र शासन आपल्या सर्वांच्या सुरक्षिततेसाठी सर्वोतोपरी प्रयत्न करते आहे. या प्रयत्नांना बळ देण्याची जबाबदारी आपलीसुध्दा आहे. दि. १६ /०८/२०२० रोजी युनिसेफच्या तज्ञ मार्गदर्शकांनी कोकणातील स्वयंसेवकांसाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणादरम्यान मा. नामदार श्री. उदयजी सामंत, मा. शिक्षणमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण, महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठाचे मा.कुलगुरु प्रा.सुहास पेडणेकर यांनी स्वयंसेवकांशी संवाद साधला होता. मा. मंत्री महोदयांनी आरोग्य व इतर सुविधा पुरविण्यासाठी प्रशासनाच्या प्रयत्नांना राष्ट्रीय सेवा योजनेची साथ मिळाली तर एक मोठे सामाजिक काम होऊ शकेल असे प्रतिपादन केले होते, तर मा. कुलगुरु महोदयांनीसुध्दा आजपर्यंत स्वयंसेवकांनी केलेल्या कामाचे कौतुक करतांना गणपती उत्सवात स्वयंसेवकांनी घेतलेल्या प्रशिक्षणाचा वापर समाजासाठी करण्याचे आवाहन केले होते.

या उत्सवामध्ये आपण स्वत:ला व आपल्या गावातील नागरिकांना कोरोना प्रादुर्भावापासून कशा पध्दतीने सुरक्षित ठेवू शकतो यासाठी जनजागृती करु या. मास्कचा योग्य वापर, दोन व्यक्तींमधे योग्य शारीरीक अंतर ठेवणे, खोकतांना, शिंकतांना नाकावर व तोंडावर रुमाल धरणे, वारंवार हात स्वच्छ धुणे या गोष्टी आपण समाजापर्यंत पोहचत्या करण्याचे प्रयत्न करु या. या सर्व बाबी विचारात घेऊन राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, मुंबई विद्यापीठ स्वयंसेवकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करत आहे.
कृपया आपल्या महाविद्यालयाच्या जास्तीत जास्त स्वयंसेवकांना या स्पर्धेमध्ये सहभागी होण्यास प्रवृत्त करावे हि नम्र विनंती.

श्री. सुधीर पुराणिक,
संचालक,
रा.से.योजना विभाग, मुंबई विद्यापीठ

सोबत : स्पर्धांचा तपशील

**घोषवाक्य स्पर्धा :**

**विषय : गणेशोत्सवातील कोरोना जनजागृती**

स्पर्धेचे नियम : घोषवाक्य तयार करुन आपल्या घराच्या बाहेरिल बाजूस नागरिकांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावायचे. घोषवाक्याखाली 'राष्ट्रीय सेवा योजना, मुंबई विद्यापीठ' असे लिहावयाचे व त्यांचे एक छायाचित्र काढून ७३८५३९९७५० या व्हॉटसअप क्रमांकावर पाठवायचे.

**भित्तीचित्र स्पर्धा :**

**विषय : गणेशोत्सवातील कोरोना जनजागृती**

स्पर्धेचे नियम : भित्तीचित्र तयार करुन आपल्या घराच्या बाहेरिल बाजूस नागरिकांना सहज दिसेल अशा ठिकाणी लावायचे. भित्तीचित्राखाली 'राष्ट्रीय सेवा योजना, मुंबई विद्यापीठ' असे लिहावयाचे व त्याचे एक छायाचित्र काढून ७३८५३९९७५० या व्हॉटसअप क्रमांकावर पाठवायचे आणि त्यासोबत स्पर्धकाचे नाव व महाविद्यालयाचे नाव लिहावयाचे.

**निबंध स्पर्धा :**

**विषय : कोरोनाच्या पार्श्वभूमीवरील गणेशोत्सवातील रा.से.यो. स्वयंसेवक म्हणून माझे योगदान**

स्पर्धेचे नियम : निबंधासाठीची शब्द मर्यादा १००० शब्द

कागदावर सुवाच्च अक्षरात लिहिलेला निबंध, वरच्या बाजूला आपले व महाविद्यालयाचे नाव लिहून स्कॅन करुन पीडीएफ फाईल ७३८५३९९७५० या व्हॉटसअप क्रमांकावर पाठवावी.

या तिन्ही स्पर्धा तालुका, जिल्हा आणि विभागीय अशा पातळयांवर घेण्यात येतील. प्रत्येक स्तरावरील प्रथम, व्दितीय आणि तृतीय क्रमांकांच्या विजेत्यांना पारितोषिक दिले जाईल.

स्पर्धेसाठी आपली प्रवेशिका म्हणजेच छायाचित्रे अथवा निबंध पाठविण्याचा अंतिम दिनांक : ०४/०९/२०२०

स्पर्धेचा निकालचा दिनांक : २४/०९/२०२०

श्री. सुधीर पुराणिक,<br>
संचालक,<br>
रा.से.योजना विभाग,<br>
मुंबई विद्यापीठ